# Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Chandrapur

# Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum Chandrapur

डॉ. खत्री महाविद्यालयात सायबर व वाहतूक सुरक्षा जनजागृती अभियान उपक्रम संपन्न .

स्थानिक डॉ .खत्री महाविद्यालय, तुकुम ,चंद्रपूर येथे दिनांक १० सप्टेंबर 2025 रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा आणि वाहतूक सुरक्षा जनजागृती अभियान हा उपक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे एम काकडे सर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सायबर क्राईम ब्रांच एसपी ऑफिस चे श्री मुजावर अली तसेच दुसरे मार्गदर्शक वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री रवींद्र चेरकुलवार , रमेश महेशकर, तसेच संस्थेच्या कोषाध्यक्षा प्राध्यापिका अनुश्री पाराशर मॅडम, डॉ.टी एम शेख ,कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. माधवी पाल इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते कार्यक्रमात याप्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक श्री मुजावर अली म्हणाले की सायबर क्राईम टाळण्यासाठी पासवर्ड सुरक्षा ,ओटीपी शेअर करणे ,सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, याबाबतीत वेगवेगळे उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले ,तर वाहतूक सुरक्षा विषयी मार्गदर्शन करताना पोलीस उपनिरीक्षक श्री रवींद्र चेरकुलवार म्हणाले की हेल्मेटचा वापर ,वाहतुकीचे नियम पाळणे, मद्यपान करून वाहन चालवण्याचे दुष्परिणाम आणि जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थेच्या कोषाध्यक्षा कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी प्रा.अनुश्री पाराशर यांनीही डिजिटल युगातील सुरक्षितता यावर आणि वाहतुकीत शिस्त पाळण्याची जाणीव निर्माण करून दिली.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे एम काकडे सर यांनी अध्यक्षीय भाषणात सायबर जगातील धोके, फसवणूक टाळण्याचे मार्ग आणि सुरक्षित इंटरनेट वापराचे महत्व यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाची प्रस्ताविक डॉ. माधवी पाल यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.सी.एन. डोंगरवार यांनी केले ,मान्यवरांचे आभार प्रा. सादलवार मॅडम यांनी मानले. कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हे विशेष.






डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
सायबर सुरक्षा आणि वाहतुक सुरक्षा
जनजागृती अभियान
DNYANDEEP SHIKSHAN PRASARAK MANDAL'S
DR. KHATRI MAHAVIDYALAYA,
TUKUM CHANDRAPUR


डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
सायबर सुरक्षा आणि वाहतुक सुरक्षा
जनजागृती अभियान




डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
सायबर सुरक्षा आणि वाहतुक सुरक्षा
जनजागृती अभियान